**प्रेसनोट**

लाा.प्र. विभाग, धुळे
दिनांक ११.०९.२०२५

**लोकसेवक रविंद्र शामराव धुमाळ, मुकडदम, आरोग्य विभाग, महानगर पालिका, धुळे यांनी तक्रारदार यांचेकडे ८,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | धुळे शहर पो.स्टे. गुरनं. २९८ /२०२५ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. ११.०९.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | रविंद्र शामराव धुमाळ, वय ५० वर्षे, मुकडदम, आरोग्य विभाग, महानगर पालिका, धुळे, रा. भटाईमाता रिक्षा स्टॉप जवळ, मोहाडी उपनगर, धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ७,०००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—** तक्रारदार हे धुळे महानगर पालिकेत आरोग्य विभागात वार्ड क्र. १४ मध्ये सफाई कर्मचारी म्हणुन कार्यरत आहेत. सफाई कर्मचाऱ्यांवर देखरेख करण्याकरीता मुकडदम म्हणुन यातील आलोसे यांची नेमणुक आहे. त्यांच्याकडे सफाई कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे पाठविण्याचे काम आहे. त्यावरुन सफाई कर्मचाऱ्यांचा पगार निघत असतो. त्याप्रमाणे तक्रारदार यांचा ऑगस्ट २०२५ अखेर पावेतोचा पगार त्यांना अदा करण्यात आला आहे.

आलोसे हे तक्रारदार डयुटीवर असतांना त्यांना सतत भेटुन त्यांच्या डयुटीची हजेरी लावुन हजेरी तक्ता पाठविल्यावरुन त्यांचा ऑगस्ट महिन्याचा पगार निघाला असुन त्या मोबदल्यात त्यांना ८,०००/— रुपये दयावे लागतील, तरच ते त्यांची पुढच्या महिन्याची हजेरी लावतील, असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करीत होते. त्यानंतर आलोसे यांनी तक्रारदार यांना पुन्हा भेटुन त्यांच्याकडे ८,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दि.११.०९.२०२५ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचांसमक्ष ८,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७,०००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार याच्याकडुन ७,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>मो. नं. ९८३४२०२९५५, ९४०३७४७१५७ |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, रामदास बारेला, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री कमांक** :— १०६४
**दुरध्वनी कमांक** :— ०२५६२—२३४०२०

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे.